Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

०४ /२०२६

**विषय - नागरिकांची सनद अद्ययावत करून प्रसिध्द करणेबाबत**

**संदर्भ - १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांचे क्र. संकीर्ण -२०२४/प्र.क्र.HTED-२०११/ १२५ / २०२४ -MHT-(EST२) समन्वय दि.१६ डिसेंबर, २०२५ रोजीचे पत्र**

सर्व अधिविभागप्रमुख व प्रशासकीय विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, सोबत प्रधान सचिव (प्र.ना.उ. व सु.) सामान्य प्रशासन विभाग यांचे क्रमांक नासद-१५२५/प्र.क्र.५६/र.व का.२यांचे दि.०९/१२/२०२५ चे अर्धशासकीय पत्र अवलोकनी घेवून आपल्या विभागाची नागरिकांची सनद (सेवा व सुविधा) अद्ययावत करून विहित नमूना प्रमाणे आपल्या अधिविभाग/प्रशासकीय विभागाच्या दर्शनी भागात व विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी. याची सर्वांनी काटेकारपणे अमंलबजावणी करावी.

( डॉ. व्ही. एन. शिंदे )

**कुलसचिव**

**जा.क्र. आस्थापना/** ४९

दि. 08 JAN 2026

**प्रति,**

माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक,

२) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. अधिष्ठाता, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.

३) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार, चौथा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
Email ID:- do.asthahte-mh@gov.in

क्रमांक:- संकीर्ण -२०२४/प्र.क्र. HTED-२०११/१२५/२०२४-MHT-(EST२) समन्वय

दिनांक:-१६ डिसेंबर, २०२५.

प्रति,

१) संचालक, (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२) संचालक, (तंत्र शिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३) संचालक, (कला), कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

४) कुलगुरु, ( सर्व अकृषी विद्यापीठे)

**विषय- नागरिकांची सनद अद्ययावत करुन प्रसिद्ध करण्याबाबत**

सोबत प्रधान सचिव ( प्र.ना.उ.व सु.), सामान्य प्रशासन विभाग यांचे क्रमांक नासद-१५२५/ प्र.क्र. ५६/र.व का.-२, यांचे दिनांक ९/१२/२०२५ चे अर्धशासकीय पत्र पाठविण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम-३ मध्ये नमूद केल्यानुसार , प्रत्येक कार्यालयाने/ विभागाने त्यांच्याकडून देण्यात येणाऱ्या सुविधा किंवा सेवा पुरविण्यासाठी सादर केलेल्या परिपूर्ण अर्जावर कार्यवाही करण्याकरीता लागणारा कालावधी नागरिकांच्या सनदेत नमूद करणे अपेक्षित आहे.

३. मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७/११/२०२५ रोजी झालेल्या बैठकीत, सर्व विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सेवांचा नागरिकांच्या सनदेमध्ये समावेशर करुन प्रसिद्ध करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार, नागरिकांची सनद प्रसिद्ध करण्यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ९/१२/२०२५ च्या पत्रात दिलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी तसेच आपल्या अधिनस्त कार्यालयांची अद्ययावत नागरिकांची सनद ( सेवा व सुविधांसह) शासनाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी व त्याची एक प्रत शासनास उपलब्ध करुन देण्यात यावी.

आपली,

सं.चं.जाधव

( संचिता जाधव )

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत : वरीलप्रमाणे

प्रत,

१) सर्व सहसचिव/उपसचिव (मशि/तांशि/विशि/समन्वय), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

२) निवडनस्ती (सा.शि )

F:\RUPESH\cr१३१-२५- नागरिकाची सनद अद्ययावत करुन प्रसिद्ध करण्याबाबत.docx

11/12/25

Reply all | Delete Junk | ...

# नागरिकांची सनद अद्ययावत करुन प्रसिद्ध करणेबाबत

Reply all |

DESK 18 A

allsec

Rajesh Aggarwal; hemant.mahajan@nic.in; ashok.redekar@nic.in; vitthal.shinde@nic.in

नागरिकांची सनद अद्यावत ...

attachments (6 MB) Download

कृपया, या सोबतचे जोडपत्र पहावे.

रवका-2,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई.

उ.स. (रवका)

11/12

अतुल पाटणे
प्रधान सचिव (प्र.ना. ज. व .सु.)

अ.शा.पत्र क्र. नारद-१५२५/ प्र.क्र. ५६/
र.व.का. -२
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु
चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक ९ डिसेंबर, २०२५

विषय :- नागरिकांची सनद अद्ययावत करुन प्रसिद्ध करणेबाबत.

महोदय/ महोदया,

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ३ मध्ये नमूद केल्यानुसार, प्रत्येक कार्यालयाने/विभागाने त्यांच्याकडून देण्यात येणाऱ्या सुविधा किंवा सेवा पुरविण्यासाठी सादर केलेल्या परिपूर्ण अर्जावर कार्यवाही करण्याकरिता लागणारा कालावधी नागरिकांच्या सनदेत नमूद करणे अपेक्षित आहे. प्रत्येक कार्यालयाने/विभागाने नागरिकांची सनद प्रसिद्ध करणेबाबतच्या सूचना या विभागाकडून वेळोवेळी परिपत्रकान्वये, अर्धशासकीय पत्रान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

०२. तथापि, विभागामार्फत देण्यात येणाऱ्या सेवांची माहिती नागरीकांना उपलब्ध होण्यासाठी सर्व विभागांनी नागरिकांची सनद अद्ययावत करणे आवश्यक आहे. मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७ नोव्हेंबर, २०२५ रोजी झालेल्या बैठकीत, सर्व विभागांनी त्यांच्या अधीनस्थ असलेल्या सेवांचा नागरिकांच्या सनदेमध्ये समावेश करून प्रसिद्ध करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

१) विभागाच्या सर्व १०० टक्के सेवांचा नागरिकांच्या सनदेमध्ये समावेश करण्यात यावा. या सेवांच्या मंजुरी प्रक्रियेचे पुनर्विलोकन करुन कालमर्यादा निश्चित करण्यात यावी.

२) सर्व कालमर्यादा निश्चित करताना, विभागांनी प्रक्रियेच्या प्रत्येक स्तरावर लागणारा वेळ विचारात घेऊन व्यवहार्य कालमर्यादा (कार्य दिन) नमूद करणे आवश्यक आहे. नागरिकांच्या सनदेचा संकेतस्थळावर प्रसिद्ध करावयाचा नमुना तसेच कार्यालयीन दर्शनी भागात प्रसिद्ध करावयाचा नमूना सोबत जोडलेल्या १ ते २ प्रपत्रात दर्शविल्याप्रमाणे तयार करण्यात यावा.

३) विभागाच्या अंतिम मंजुरीनंतर, संबंधित सेवांच्या कालमर्यादेची सूचना कार्यालयाच्या दर्शनी भागात तसेच, विभागाच्या/कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी.

४) नागरिकांना सेवेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची व्यवस्था असावी.

०३. आपणास विनंती करण्यात येते की, आपण याबाबत व्यक्तिशः लक्ष घालून आपल्या विभागाची तसेच अधीनस्त कार्यालयांची अद्ययावत नागरीकांची सनद (सेवा व सुविधांसह)

शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी. तसेच विभागाच्या/कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात यावी. व त्याची एक प्रत या विभागास उपलब्ध करुन देण्याबाबत संबंधीतांना कृपया आपल्या स्तरावर उचित निर्देश द्यावेत.

आपला स्नेहांकित

सहपत्र - वरीलप्रमाणे

(अतुल पाटणे)

प्रति,

अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग

## जोडपत्र-१

### संकेतस्थळावर प्रसिद्ध करावयाच्या सेवानिहाय नागरीकांच्या सनदेचा नमुना

विभागाचे/कार्यालयाचे नाव:-

सेवेचा नाव:-

| | | |
|---|---|---|
| १. | सेवेचा संक्षिप्त तपशिल | |
| २. | आवश्यक कागदपत्रे (यादी) | |
| ३. | ऑनलाईन अर्ज करण्यासाठी संकेतस्थळ | |
| ४. | आवश्यक शुल्क (लागू असल्यास) | |
| ५. | शुल्क भरण्याची पद्धत | |
| ६. | मंजुरीसाठी लागणारा कालावधी | |
| ७. | मंजुर करणारे सक्षम प्राधिकारी | |
| ८. | सेवेसंदर्भात तक्रार निराकरण करणारे अपिलीय अधिकारी | |

## जोडपत्र-२

### विभागाच्या/कार्यालयाच्या दर्शनी भागात प्रसिद्ध करावयाचा सेवा निहाय नागरिकांच्या सनदेचा नमुना

विभागाचे/कार्यालयाचे नाव:-

| अ.क्र. | सेवेचे नाव | सेवा मंजूर करण्याची कालमर्यादा (कार्य दिन) | सेवा मंजूर करणारे प्राधिकरण/अधिकारी | तक्रार दाखल करण्यासाठी संबंधित अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |